**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.**

'STARS' प्रकल्पांतर्गत

# संकलित मूल्यमापन १ : २०२४-२५

**इयत्ता - पाचवी : विषय - मराठी (प्रथम भाषा)**

**उत्तरसूची**

## उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| १० | ४० | ५० |

**तोंडी चाचणी**

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. १) | **खाली दिलेल्या कृतीवर आधारित प्रश्नांची उत्तरे सांग.** | 05.01.02 | ५ |
| | शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'पतंग बनविणे' या कृतीवर आधारित तोंडी प्रश्न विचारावेत. | | |
| | अ) पतंग बनविण्यासाठी लागणारे साहित्य पुढीलप्रमाणे सांगितल्यास<br>रंगीत कागद, काड्या, दोरा, चक्री, फिरकी, कात्री यांसारखे अन्य साहित्य सांगितल्यास,<br>वरील साहित्यातील कोणत्याही दोन गोष्टी सांगितल्यास २ गुण द्यावेत.<br>एक साहित्य सांगितल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | आ) विद्यार्थ्यांनी कोणत्याही रंगाचा उल्लेख केल्यास त्यास १ गुण द्यावा. | | १ |
| | इ) पतंग उंच उडण्यासाठी हवा, मांजा, दोरीची आवश्यकता असते हे उत्तर दिल्यास १ गुण द्यावा. | | १ |
| | ई) पतंग 'मकरसंक्रातीला' उडवितात हे उत्तर दिल्यास १ गुण द्यावा. | | १ |
| प्र. २) | **खालील उतारा वाच आणि त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 05.01.06 | ५ |
| | अ) अति झालं नि हसू आलं, अति तिथं माती, अति शहाणा त्याचा बैल रिकामा, नमनाला घडाभर तेल यांपैकी कोणत्याही दोन म्हणी सांगितल्यास २ गुण द्यावेत.<br>कोणतीही एक म्हण सांगितल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | आ) स्वत:च्या मित्र किंवा मैत्रिणीला केलेली मदत सांगितल्यास.<br>दोन ते तीन वाक्य सांगिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक वाक्य सांगितल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | ई) गीताला वेळीच सावध केलं पाहिजे, तिच्यासाठी जीव तुटतो माझा, तिला कोणी नावं ठेवली, तर माझ्या जिवाची घालमेल होते.<br>वरीलपैकी कोणत्याही एका वाक्यास १ गुण द्यावा. | | १ |

| लेखी चाचणी | | | |
|---|---|---|---|
| **प्र. क्र.** | **योग्य उत्तरे व सूचना** | **अध्ययन निष्पत्ती क्र.** | **गुणदान** |
| **प्र. ३)** | **सूचनेनुसार उत्तरे लिही.** | **05.01.05** | **५** |
| | अ) सहलीचे ठिकाण लिहिल्यास १ गुण द्यावा. | | १ |
| | आ) सहलीसाठी सोबत घेतलेले साहित्य -<br>दोन वस्तूंची नावे लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एका वस्तूचे नाव लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २<br><br>१ |
| | इ) योग्य वाक्यरचनेसह दोन सूचना लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>योग्य वाक्यरचनेसह एक सूचना लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| **प्र. ४)** | **खाली दिलेला उतारा वाच व सूचनेनुसार त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.** | **05.01.08** | **५** |
| | अ) उंडग्या/उंडगा, दांडगा यापैकी कोणतेही एक संबोधन लिहिल्यास १ गुण द्यावा. | | १ |
| | आ) १) कातावणे : रागावणे, चिडणे, संतापणे यांपैकी कोणताही एक अर्थ लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>२) वणवण हिंडणे : भटकणे, हवी असलेली गोष्ट मिळविण्यासाठी खूप फिरणे यांपैकी कोणताही एक अर्थ लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | इ) निसर्गातील पाऊस, ढग हे घटक माणसांसारखे कसे वागू शकतात या विचाराने, आई आपल्याला रागावते त्याप्रमाणेच पावसाला व ढगालाही रागावते या विचाराने बिम्मला गंमत वाटली असेल अशा आशयाचे उत्तर लिहिल्यास २ गुण द्यावेत. विद्यार्थ्यांच्या भावविश्वाचा, त्यांच्या शब्दसंपत्तीचा विचार करून योग्य गुणदान करावे.<br>दोन वाक्य सांगितल्यास २ गुण द्यावेत.<br>एक वाक्य सांगितल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| **प्र. ५)** | **दिलेले शब्दकोडे पूर्ण कर. त्यातील कोणताही एक शब्द वापरून एक अर्थपूर्ण वाक्य तयार करून लिही.** | **05.01.09** | **४** |
| | एक अचूक शब्दास १ गुण या प्रमाणे तीन अचूक शब्दांस ३ गुण द्यावेत. | | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १. अ | **न** | २. वा | **णी** |
| | | **व** | |
| ३. का | **पू** | र | |

| | | | |
|---|---|---|---|
| | शब्दकोड्यातील कोणताही एक शब्द वापरून एक वाक्य लिहिल्यास १ गुण देण्यात यावा. | | १ |
| **प्र. ६)** | **सूचनेनुसार उत्तरे लिही.** | **05.01.10** | **५** |
| | अ) ऑलिम्पिक स्पर्धेत स्वप्निल कुसाळेने पदक जिंकून भारताची मान उंचावली आहे. स्वप्निलच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे <u>तो</u> तर आनंदी झाला आहेच; शिवाय <u>त्याचे</u> कांबळवाडी हे गावही आनंदात न्हाऊन निघाले आहे.<br>याप्रमाणे दोन सर्वनामे वापरून उतारा पुन्हा लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक सर्वनाम वापरून उतारा पुन्हा लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |

<table>
<tr><th>प्र. क्र.</th><th>योग्य उत्तरे व सूचना</th><th>अध्ययन निष्पत्ती क्र.</th><th>गुणदान</th></tr>
<tr><td></td><td>आ)
<table>
<tr><th>विरामचिन्हे</th><th>नाव</th></tr>
<tr><td>-</td><td>संयोगचिन्ह</td></tr>
<tr><td>—</td><td>अपसरणचिन्ह</td></tr>
</table>
दोन्ही विरामचिन्हांची योग्य नावे लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एका विरामचिन्हाचे नाव लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>इ) उसाची वाहतूक बैलगाडीतून केली जात होती. किंवा<br>उसाची वाहतूक बैलगाडीतून केली जात असे.<br>या उत्तरास १ गुण द्यावा.</td><td></td><td>२<br><br>१</td></tr>
<tr><td>प्र. ७)</td><td>योग्य ठिकाणी विरामचिन्ह दे व वाक्य पुन्हा लिही.</td><td>05.01.11</td><td>२</td></tr>
<tr><td></td><td>अ) सुबे, इजार जरा चार बोटं कापून टाकं घालतीस का?<br>आ) किती अभिमान वाटतो आम्हाला कविताचा!<br>याप्रमाणे योग्य विरामचिन्हे देऊन दोन वाक्ये लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>योग्य विरामचिन्हे देऊन एक वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा.</td><td></td><td>१<br>१</td></tr>
<tr><td>प्र. ८)</td><td>सूचनेनुसार उत्तरे लिही.</td><td>05.01.13</td><td>६</td></tr>
<tr><td></td><td>अ) १) नदीकाठी खेळलो. नदीकाठी माती उकरून छोटी-छोटी घरे बनवली. सूर्यास्त पाहिला. यांपैकी कोणत्याही दोन कृती लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक कृती लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>२) नद्या भरून वाहू लागतात. शेते हिरवीगार होतात. डोंगर हिरवाईने नटतात. वातावरण प्रसन्न, आल्हाददायक असते इत्यादी. अशा आशयाचे समर्पक उत्तर लिहिल्यास दोन मुद्द्यांना २ गुण द्यावेत.<br>निसर्ग बदलाचा एखादाच मुद्दा लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>आ) मी माझ्या मित्र किंवा मैत्रिणीला उठवेल. इतर मित्र-मैत्रिणींना सोबत घेऊन मदत करेल. शिक्षकांना सांगेन. अशा आशयाचे उत्तर असल्यास २ गुण द्यावेत. विद्यार्थ्यांचा अनुभव, समज, आकलन पातळी, भावविश्व यांचा विचार करून सांगितलेला विचार स्वीकारावा.<br>दोन ते तीन समर्पक वाक्ये लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक समर्पक वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा.</td><td></td><td>२<br><br>२<br><br>२</td></tr>
<tr><td>प्र. ९)</td><td>खालील कवितेच्या ओळींमधून तुला समजलेले 'बैलाचे कष्टमय जीवन' यावर तीन ते चार वाक्ये लिही.</td><td>05.01.14</td><td>३</td></tr>
<tr><td></td><td>विद्यार्थ्यांचा अनुभव, समज, आकलन पातळी, भावविश्व आदींचा विचार करून लिहिलेल्या बाबी स्वीकाराव्यात.<br>समपर्क वाक्यात उत्तर लिहिल्यास</td><td></td><td></td></tr>
</table>

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| | तीन वाक्ये लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>दोन वाक्ये लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. | | ३<br>२<br>१ |
| **प्र. १०)** | **सूचनेनुसार उत्तरे लिही.** | **05.01.15** | **१०** |
| | अ) खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे गोष्ट तयार करून, समर्पक शीर्षक दिल्यास ५ गुण द्यावेत.<br>सुसंगत, अर्थपूर्ण वाक्यरचना, आकर्षक शीर्षक इ. वैशिष्ट्ये लक्षात घ्यावीत.<br>समर्पक शीर्षक लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>६ ते ८ वाक्यांत गोष्ट लिहिल्यास ४ गुण द्यावेत.<br>४ ते ५ वाक्यांत गोष्ट लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>३ वाक्यांत गोष्ट लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>१ किंवा २ वाक्यांत गोष्ट लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>आ) 'आमचे घर' या विषयावर खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सहा ते आठ वाक्यांत निबंध लिहिल्यास ५ गुण द्यावेत.<br>६ ते ८ वाक्ये लिहिल्यास ५ गुण द्यावेत.<br>५ ते ६ वाक्ये लिहिल्यास ४ गुण द्यावेत.<br>३ ते ५ वाक्ये लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>२ ते ३ वाक्ये लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>१ ते २ वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>(मुद्द्याला अनुरूप व सुसंगत वाक्यरचना असावी.) | | ५<br><br><br><br><br><br><br><br>५ |

■■■